REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# तथागत गौतम बुध्दांचा पर्यावरण विषयक विचार एक भौगोलिक अभ्यास

**प्रा.कांबळे दयानंद सखाराम**
एम.ए. नेट् , भूगोल विभाग ,
जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**गोषवारा : -**
मानव आणि पर्यावरण यांचा फारच जवळचा संबंध आहे. हा मानवाच्या अस्तित्वापासून आहे. मानव आणि पर्यावरण यांच्या तील नाते दुहेरी समजले जाते. पर्यावरणाचा मानवावर जसा परिणाम होतो. तसाच मानवाचाही पर्यावरणावर प्रभाव पडतो. मानवाला जसे स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा अधिकार आहे. तद्वतच इतर सजीवांनाही आपले अस्तित्व टिकविण्याचा हक्क आहे. पर्यावरणात मानव हा बुध्दिमान प्राणी आहे. मानवाच्या स्वार्थी, लोभी व अतिरेकी प्रवृत्तीमुळे पर्यावरणाचा -हास होत चाललेला आहे. तथागत गौतम बुध्दाच्या संपूर्ण जीवनामध्ये पर्यावरणातील वनसंपदेला फारच महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारी संपूर्ण मानवी समाजाची आहे. हा गौतम बुध्दांचा मूलमंत्र रूजवीने गरजेचे आहे.




**बीज संज्ञा -** मानव, पर्यावरण , वन , जीव जंतू

**प्रस्तावना :**
आज मानवाने विज्ञानाच्या जोरावर मोठया प्रमाणात प्रगती केली आहे. मानवाने अपले जीवन सूखी व समृध्द करण्यासाठी निसर्गातील मूळ व्यवस्थेमध्ये तो सतत बदल घडवनू आणत आहे. निसर्गामध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये संतुलन ठेवण्याची व्यवस्था आहे. परंतू मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे निसर्गातील काही घटकाचा मोठया प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे संपूर्ण पर्यावरणातील निसर्ग व्यवस्थेवर त्याचा परीणाम होतो. परंतू मानवाने याचा विचार केला नाही. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृती निसर्ग प्रधान राहिलेली आहे. पर्यावरणातील जल, वायू, अग्नि , वृक्ष,जीव आणि पृथ्वी यांच्या पुजेवर भर दिला गेला आहे.

प्राचीन काळापासून मानवाने नैसर्गिक घटकांचे महत्व जाणले हाते व मानवाने त्याचा स्विकारही केला होता. परंतू मानवी संस्कृतीच्या वाटचालीत त्याने औद्योगिक क्रांती घडवून आणली. याच काळात अनेक नवनविन शोध लागले, शेती, उद्योग, औषधनिर्माण अशा अनेक प्रकारच्या क्षेत्रात मानवाने बुध्दिमत्तेच्या जोरावर क्रांती घडवून आणली. त्याचा परिणाम वाढती लोकसंख्या शहरीकरण व नागरीकरण यासारख्या अनेक समस्या मानवाला भेडसावू लागल्या. मानव व निसर्ग यांच्यात जो संघर्ष आहे. त्यात दिवसेंदिवस वाढ होत चाललेली आहे. पर्यावरणशास्त्र हे एक जलदगतीने विस्तारणारे शास्त्र आहे. पर्यावरणाच्या संदर्भात अनेक अभ्यासकाने आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला. इ.स.1960 च्या सुमारास पर्यावरण शास्त्र उदयास आले. पर्यावरणाचा अभ्यास अलिकडच्या

काळातच केला जातो असे नाही तर प्राचीन भारतीय संस्कृति मध्ये देखील केला जात होता. भारतात अनेक स्थित्यंतरे झाले आहेत. बौध्द धर्मांचे संस्थापक तथागत गौतम बुध्दाने त्याच्या काळात बोलली जाणारी लोकभाषा ( पाली ) मध्ये आपले अनमोल विचार, तत्वज्ञान पाली त्रिपिटकातून, अनुपिटक, अष्टकथा इत्यादी साहित्यातून पर्यावरण विषयक विचार परखडपणे मांडलेला आहे. त्यांचे संपूर्ण जीवनच निसर्गाच्या सानिध्यात गेलेले आहे.

### सशोधकाचे महत्व ( Significance of Research ) :-

प्रस्तुत संशोधन समस्येमध्ये पर्यावरणाचा होत जाणारा -हास व पर्यावरण संवर्धना बाबत तथागतांचे विचार यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

### संशोधनाचे उद्दिष्टे :-

1) पर्यावरणाचा अभ्यास करणे
2) तथागत गौतम बुध्दांच्या पर्यावरण विषयक विचाराचा शोध घेणे
3) पर्यावरणाचा -हास का होत आहे याचा अभ्यास करणे
4) पर्यावरण संवर्धनासाठी उपाय सूचविणे

### संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आला. यामध्ये विविध पुस्तके, वर्तमानपत्र , इंटरनेट इत्यादी माध्यमातून माहिती संकलित केली आहे.

### विषय विवेचन :-

पर्चावरण हा शब्द व्यापक स्वरूपाचा आहे. व्युत्पत्ति शास्त्राच्या दृष्टिने पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ठ भागाशी निगडित असलेली सभोवतलाची परिस्थिती 'Environ' या मुळ फ्रेंच शब्दापासून प्रचलीत झाला आहे. Environer' या शब्दाचा अर्थ Totoal set of surrounding किंवा संपूर्ण परिस्थितीकी असा आहे. वास्तविक पाहता Environment शब्द फ्रेंच भाषेतील Environer या शब्दापासून बनलेला आहे. त्याचा तात्पर्य संपूर्ण पृथ्वी असा होतो. त्यामध्ये संपूर्ण परिस्थिती वनस्पती, प्राणी व जीव जंतू यावर प्रभाव टाकतात भूगोलामध्ये पर्यावरणास विशेष महत्व आहे. याचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मानवाशी संबंध आहे. बौध्दिक व शारीरिक क्षमता, कार्यप्रणाली व्यवहार आचार विचार, वेश-भूषा, धर्म इत्यादीवर पर्यावरणाचा प्रभाव पडतो.

पर्यावरण एक असे रंगमंच आहे. की ज्यावर मानवाच्या संपूर्ण क्रिया अवलंबून आहेत आवासित मानव जीव-जंतू, प्राकृतिक घटक व आवश्यकता यामध्ये सामंजस्य स्थापित करून इतर क्रियामुळे त्याचे अस्तिव्त्व आहे. पर्यावरणामतील सामंजस्यावर मानवाच्या क्रिया अवलंबून आहेत. पर्यावरणातील सामंजस्यावर मानवाच्या क्रिया अवलंबून आहेत. त्यामुळेच पर्यावरण व मानव यांचा फारच निकटचा संबंध आहे. वास्तविक पाहता मानव हा देखील पर्यावरणाचा एक अंग आहे. मानव एक असा प्राणी आहे की, आपल्या अस्तित्वाबरोबरच पर्यावरणाच्या संदर्भात विचार करू शकतो. पर्यावरणातील उत्पादनाचा उचित प्रमाणात उपभोग घेऊ शकतो. व त्याची देखभाल करू शकतो. इतर प्राणी व जीव जंतूना पर्यावरणातून काही मिळविता किंवा त्याला काही हानी पोहचते. त्यासंदर्भात त्याना काही ज्ञान नसते. मानव विशिष्ट पर्यावरणात जन्म घेऊन, पर्यावरणातील साधन-संपत्तीचा मानवी कल्याणासाठी उपयोग करून घेऊ शकतो. तसेच त्यामुध्ये परिवर्तन देखील करतो. परंतू पर्यावरण मानव जीव जंतू यांच्या संदर्भात बरेच महत्वाचे आहे.

**पर्यावरण म्हणजे काय ?**

1)पृथ्वीवरील विशिष्ट किंवा ठरावीक भागात उपलब्ध असलेली सर्व सजीवांच्या सभोवतालची परिस्थिती ( Environ: to surround) म्हणजे पर्यावरण होय.

2) एक किंवा अनेक सजीवांचे अस्तित्व असते. सजीव, निर्जीव घटक निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटक या सर्वांचे मिळूण पर्यावरण निर्माण होते.

3) फिटिंग (1922) यांच्या मते जीवाचे परिस्थितिक योग हे पर्यावरण आहे.

4) टान्सले ( 1926 ) प्रभावकारी दशाओं का वह सम्पूर्ण योग पर्यावरण है ।

संपूर्ण पृथ्वी देखील एक पर्यावरण आहे. पर्यावरण स्थल व काळ या बरोबरच जीवसापेक्ष आहे. जे पर्यावरण एका सजीवास किंवा सजीव समूहास तारक असते. तेच पर्यावरण दुस-या सजीवास किंवा सजीव समूहास मारकही ठरू शकते. अतिप्राचीन काळात हिम युगातील हिमावरणामुळे पुथ्वीवरील पर्यावरण सजीवांना प्रतिकूल होते. या काळात काही प्राणी नामशेष झाले. हिमयुगातील हिमावरणाचा काही भाग आज उष्ण वाळवंटीय पर्यावरणाचा आहे. मानवासाहित इतर सजींवाना आजही तेथील पर्यावरण पोषक नाही. तथापि खनिजे व शक्तिसाधनांच्या अस्तित्वामुळे या पर्यावरणात मानवी समुहांचा विकास झाला आहे. म्हणून कोणत्याही अनुकूल व प्रतिकूल पर्यावरणचा अभ्यास स्थल, काल व जीवसापेक्ष असतो.

**पर्यावरणाचे प्रकार :**

पर्यावरणचे मुख्यतः 1) नैसर्गिक पर्यावरण 2) सांस्कृतिक पर्यावरण असे दोन पर्यावरणाचे पमुख प्रकार पडतात.

पर्यावरण

- नैसर्गिक
  - मृदावरण
  - जलावरण
  - वातावरण
  - 1) प्राकृतिक रचना
  - 2) हवामान
  - 3) प्रवाह प्रणाली
  - 4) जमीन / मृदा
  - 5) भूगर्भरचना
  - 6) प्राणी
  - 7) वनस्पती
  - 8) सूक्ष्मजीव
- सांस्कृतिक
  - 1) लोकसंख्या
  - 2) अर्थिक
  - 3) सामाजिक
  - 4)राजकीय
  - 5) धार्मिक
  - 6) सांस्कृतिक

या दोन्ही प्रकारच्या पर्यावरणा संदर्भात तथागत गौतम बुध्दानी त्यांच्या पाली'त्रिपिटक ' या ग्रंथामध्ये पर्यावरणा संदर्भात विचार व्यक्त केले आहेत. तथागत गौतम बुध्दांनी पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून आपले विचार उपदेश देताना त्यांनी अनेक उपमा देवून उदाहरणे देवून पर्यावरणाचे महत्व त्रिपिटका मध्ये सांगितले आहेत. तथागतांचे पर्यावरण विषयक विचार पाली-त्रिपिटक, अनुपिटक व अष्टकथा इत्यादी साहित्यामधुन आपणास पाहवयास मिळतात. तथागतांचा पर्यावरणासंदर्भात दिलेला उपदेश समजण्यास सहज व सोप्या स्वरूपाचा वाटतो. तथागतांचा जीवन काल हा पूर्णपणे निसर्गाच्या सहवासात गेलेला आहे. त्यांचा जन्म निसर्गाच्या सानिध्यात शालवृक्षाखाली लुंबीनी वनात

LBP PUBLICATION

झाला. पिंपळाच्या वृक्षाखाली त्याना दिव्यज्ञान प्राप्त झाले तेव्हापासून या वृक्षाला बोधीवृक्ष असे म्हणतात. बोधी या शब्दाचा अर्थ आहे. ज्ञान, तथागताना ज्ञानप्राप्त झाले तेव्हा ती वेळ होती रात्रीची बोधी प्राप्त रात्री पहिल्या , दुस-या व तिस-या प्रहरामध्ये पिंपळाच्या झाडाखाली ध्यानस्त बसूनच बुध्दत्व प्राप्त झाले. अनुलोम, प्रतीलोम म्हणजे पुढून शेवटाकडे नेणारा व शेवटाकडून पुढे नेणार असा प्रतित्यसमुत्पाद, चार आर्यसत्य, आष्टांगमार्ग यामध्ये प्रत्यक्ष पाहिले.

पर्यावरणात ✕ऑक्सिजन या वायुचे प्रमाण 20.95 % इतके आहे. पर्यावरणात या वायुचे महत्व मानवाच्या दृष्टीकोनातून उपयोगी आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने मानवाने आपले आरोग्य सुदृढ कसे ठेवावे हे सुध्दा तथागत बुध्दांच्या उपदेशामधून आपणास पर्यावरणा विषयी माहिती मिळते पर्यावरणामध्ये मानव हाच महत्वाचा घटक नसून संपूर्ण पशू-पक्षी , प्राणी वन्य जीव, पाळीव प्राणी, जलचर प्राणी इत्यादी या पर्यावरणाचा लाभ घेऊ शकतात व आपले जीवन जगू शकतात. 'जगा आणि जगू द्या 'या उक्तीप्रमाणे जीवन जगण्याचा सर्वच प्राणीमात्रांना अधिकार आहे. अशा प्रकारचे अनेक विचार बुध्दानी आपल्या उपदेशातून सांगितले आहेत.

प्राचीन काळात भारतात यज्ञ केले जात होते. लोक स्वर्गासाठी यज्ञ करत असत यज्ञामध्ये घोडे, बैल,बकरी इत्यादीचा बळी दिला जात होता. यज्ञासाठी हजारो वृक्ष तोडले जात असत. हे सर्व गौतम बुध्दानी पाहिले यामुळे पर्यावरणाचा -हास होतो, असे त्यांना वाटले. त्यामुळे त्यानी यज्ञ या प्रकारास विरोध केला.

पंचशीलातील पहिले शील आहे प्राणी मात्राची हत्या न करणे बुध्द असे म्हणतात की जसा मी आहे. त्याच प्रकारे इतर प्राणी आहे. असे अन्य प्राणी आहेत. त्याच प्रकारचा मी आहे. कोणासही मारू नये असी अनुमती दिली. लोक हिंसा करू नये म्हणून बुध्द जीवनभर प्रयास करत राहिले. बोधिसत्व मानवच नाहीत तर वाघ, हत्ती, घोडा, हरिण, बैल, माकड, कुत्रा, हंस , चित्तर इत्यादी पशू पक्षांच्या रूपामध्ये देखील आहे. पर्यावरणातील संपूर्ण पदार्थ, पृथ्वी, प्राणी, अग्नि, वायू या मुळे विकसीत होणा-या पदार्थामुळे, वनस्पती, पशु-पक्षी व मानव येत असतात, असे वर्णन " मिलिंद प्रश्न " या ग्रंथात आढळतात. प्रत्येक वस्तुमध्ये कोणते ना कोणते आवश्यक गुण असतात. त्यामुळे पर्यावरणातील या घटकांना सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. पर्यावरण सुरक्षित राहिल यासाठी बुध्दांनी त्याकाळात सांगितले होते की झाडामध्ये देखील जीवन असते वनस्पती पर्यावरणात महत्वाची भूमिका निभावतात. त्यामुळे त्यानी सर्व भिक्षूना सांगितले की रिकाम्या वेळी झाडाना पाणी घालणे व त्याची काळजी घेणे. बुध्दांनी डाकू अंगुलिमालास भिक्षू बनवल्यानंतर त्याला पहिले काम रोपाना व झाडांना पाणी घालण्याचे सोपविले होते. त्यांनी भिक्षूना सांगितले की हिरवेगार रोप, झाडे तोडू नका त्याच्यामध्ये जीवन असते. ते पशुपक्षांना मनुष्यास , दान , अन्न, फळे, फुले, औषधे व प्राणवायू देवून मानवतेची मुक्त सेवा करतात. त्यांनी भिक्षूना हे पण सांगितले की रोप, वनस्पती यापासून खाणे योग्य फल, फळे व पाने तोडू नये तर स्वतः पिकल्यानंतर जमिनीवर पडतात. तेव्हाच त्याचा खाण्यासाठी उपयोग करावा! बुध्दांन भिक्षूना गावात व घरामध्ये निवास करण्यापेक्षा झाडाखाली व वनात राहण्यासाठी प्रोत्साहित केले होते. त्यामुळे तथागताचे पर्यावरणासंदर्भात विचार अतिशय महत्वाचे होते.

" सुत्तनिपात " या ग्रंथात कृषिभारद्वाज सुत्त आहे. या सुत्तामध्ये भगवान बुध्द आणि कृषिभारद्वाज ब्राम्हणाचे शेती विषयक संवाद आहे. कृषिभारद्वाज शेतामध्ये एकदाच 500 नांगर चलवत होते. शेतीला भोजनाच्या पंक्तीचे सुध्दा वाटप चालू होते. तेव्हा भगवान बुध्द मगध देशामध्ये दक्षिणगिरी प्रांतातील एकनाळ नावाच्या ब्राम्हण गावात राहत होते. तेव्हा सकाळच्या भोजनाच्या वेळी भगवान बुध्द भिक्षाटनासाठी कृषिभारद्वाजांच्या शेतामध्ये गेले व तेथे भोजनाच्या पंक्तीमध्ये उभे राहिले. तेव्हा कृषिभारद्वाज ब्राम्हणाने बुध्दाला पाहिले व त्यांना भोजन न देताच त्यांना असे म्हणाला, हे श्रमणा ! मी नांगरतो व पेरतो नांगरून व पेरून मी माझा उदरनिर्वाह करतो, हे श्रमणा तुही नांगर व पेर, नांगरून व पेरून तुझा उदरनिर्वाह कर. अशा प्रकारे कृषिभारद्वाज ब्राम्हणाने विचारलयानंतर भगवान बुध्द त्याला म्हणाले हे ब्राम्हणा ! मी सुध्दा नांगरतो व पेरतो मी माझा उदरनिर्वाह करतो तेव्हा कृषिभारद्वाजने विचारले हे श्रमणा ! तुम्ही स्वतःला शेतकरी म्हणत आहात परंतू तुमची शेती आम्हास दिसत नाही. मग तुमचे जू, नांगर, फाळ, चाबूक व बैल आम्हास दिसत नाहीत तरीही तुम्ही शेती करता असे म्हणता. आम्हाला समजावून सांगा की, तुमची शेती कोणती? यावर भगवान बुध्दाने सांगितले की, श्रध्दा हे माझे बी, तपश्चर्या ही माझी वृष्टी , प्रज्ञा हे माझा जू आणि नांगर आहे तर पापलज्जा हे माझे इसाड आहे. चित्त ही माझी दोरी व स्मृती हे माझे फळ व चाबूक आहे.

अशा प्रकारे भगवान बुध्द शेती करतात ते त्यानी कृषिभारद्वाजला समजावून सांगितले तसेच आहाराच्या बाबतीत मी संयमीत आहे. कायेच्या व उदरात पडणा-या आहाराच्या बाबतीत मी संयमीत आहे तसेच धुरा वाहणारा माझा उत्साह हा योग क्षेमाभिमूख आहे म्हणजेच निर्वानापर्यंत जावून पोहचविणारा आहे. अशा प्रकारची शेती केली असता मी अमृत फल दायक होतो अशा प्रकारे कृषिभारद्वाजला बुध्दानी शेती विषयक उपदेश या सुत्तामध्ये समजावून सांगितला आहे. सम्राट अशोकाने बौध्द धर्माचा जगभरात प्रचार आणि प्रसार केला. भारतास बुध्दाची भूमी म्हणून जगभर ओळखले जाते.

धम्मपाद या ग्रंथातून पुप्फवग्गो हि कविता घेतली आहे. या गाथेमधून भगवान बुध्दांचा पर्यावरण विषयक विचार दिसून येतो.

**गाथा :- न पुप्फगन्धो पटिवातमेति न चंदनं तगरमल्लिकावा सतत्र्य गंधो प्पटिवातमेति सब्बा दिसा सप्पुरिसो पवाति**

**अर्थ :- चंदन, तगर, जुई या फुलांचा गंध वा-याच्या उलट दिशेला जात नाही सत्पुरूषांचा सुगंध वा-यांच्या उलट दिशेलाही जातो.**

सत्पुरूषांचा सुगंध सर्व दिशांना पसरतो. भगवान बुध्दांच्या जीवनामध्ये त्यांनी प्रत्यक्ष पर्यावरणाच्या सानिध्यात आपला जीवन प्रवास केला आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात वृक्षाना अन्यसाधारण असे महत्व आहे. येथे निवडक वृक्षांचा आपण अभ्यास केलेला आहे.झाड हे आपल्याला सावली देते. तसेच ऑक्सिजन देते. जमिनीची धूप रोखण्यास मदत करते. झाडाची सावली खूप दाट असते. बरेच झाड आपणास खायला फळे देतात, झाडापासून आपणास, औषधी, फळे , फुले, हवा मिळते.

**शालवृक्ष -**

या वृक्षाची तुलाना कुल प्रमुखाशी केली आहे. ते हिमालयातील सर्वगुण संपन्न असे शाल वृक्ष आहे. शाल वृक्ष फांद्या, पाने, साला गाभासर इत्यादीची वाढ करतो तयाप्रमाणे श्रध्दावान कुलपुत्र त्याच्या अनुयायामध्ये शील, स्मृती, त्याग, प्रज्ञा, श्रध्दा इत्यादीची वाढ करतो. अशा प्रकारे या वृक्षाची तुलना कुटुंब प्रमुखाशी केलेली आहे. भगवान बुध्द हे भिक्षू संघाचे प्रमुख होते. त्यांनी आपल्या भिक्खूंना व अनुयायाना मुलासारखे साभाळले.

**ताडवृक्ष :-**

नारळाप्रमाणे ताड ही महत्वाचा वृक्ष आहे. या वृक्षाची तुलना गौतम बुध्दाशी केलेली आहे. भगवान बुध्द ही ताडवृक्षाप्रमाणे होते. तथागत आपण निरागस आहात. '' भोगरहित आहात, तपस्वी व शील संपन्न आहात.त्यातील शर्करायुक्त रसाप्रमाणे तुम्ही विमुक्त व प्रज्ञावान आहात.

**सारवान वृक्ष :-**

अनित्याशी या वृक्षाची तुलना भगवान बुध्दानी केली आहे. या वृक्षाची मुळे, फांद्या इत्यादीना त्यानी अनित्य मानले. भिक्खूंनो! सार पाहिजे असलेल्या, साराच्या शोधात असलेल्या मुनष्य, साराच्या शोधात फिरत असताना, साराचा वृक्ष सुध्दा साराला सोडून सार आणि साल यांच्या मधील मऊ लाकडाला सोडून, डहाळया- पांनाना कापून हाच सार आहे. असे समजून त्याला घेऊ चालावा. अशा प्रकार भिक्खूंनो एक कुलपुत्र साराच्या दुःखात पडतो.

**आम्रवृक्ष :** याची तुलना बुध्दानी देठापासून तुटलेल्या तृष्णामुक्त झालेल्या शरीराशी केली आहे. जोपर्यंत त्याच्या शरीरात चेतना आहे तोपर्यंत त्याचे शरीर दिसते चतेना नष्ट झाल्यावर ते शरीर दिसणार नाही.

**चंदनवृक्ष : -** हा सदाहरित वृक्ष असून पाने समोरा समोर लांबट, पातळ , टोकदार असतात. चंदनाच्या फांद्यांना, गंधहीन फुलांचे गुच्छ येतात. चंदनाचे झाड जसे वाढत जाते. तसतसे त्यातील सुगंधित तेलाचा अंशही वाढत जातो. भगवान बुध्दांनी भिक्खुना उपदेश दिला की, ज्याप्रमाणे सर्व वृक्षामध्ये कोमलता व सुंदरता या दृष्टीने चंदन श्रेष्ठ आहे. त्याप्रमाणे भिक्खूना, भी एक सुध्दा अशी गोष्ट जमत नाही की, जी अभ्यासाने इतकी कोमल व लवचिक बनते. अशा प्रकारे चंदानाची तुलाना भिक्खुंच्या चित्ताशी केली आहे. तसचे चंदन वृक्षाचे महत्व खूप आहे. बुध्दांचे महापरिनिर्वाण झाल्यावर त्यांचा देह चंदनाच्या लाकडावर जाळण्यात आला. चंदनाचा सुंगंध खूप श्रेष्ठ आहे. तो वा-याच्या दिशेने जातो. परंतु शीलवान मनुष्याचा सुंगंध चोहोबाजून पसरला जातो.अशा प्रकारे भगवान बुध्दाची किर्ती चोही दिशेंनी पसरलेली आहे.

आर्चाय रजनिश ( ओशो ) गौतम बुध्दाबद्दल म्हणतात की, '' बुध्दानंतर त्यांच्या जवळपास जाऊ शकेल असा महामानव भारताने किवा जगाने आज पर्यंत निर्माण केला नाही.''

## निष्कर्ष :

1) तथागत गौतमबुध्दानी पृथ्वीवरील वृक्षांना महत्वाचे स्थान दिले होते.
2) तथागत गौतमबुध्दानी पर्यावरणाविषयी आपले अनमोल विचार मांडले ते आज तंतोतंत लागू पडतात.
3) नैसर्गिक पर्यांवरणात राहून मानवाला आपला विकास करता येतो व निती मूल्याची जोपासना करता येतो.

## संदर्भ ग्रंथ :

1) कोसंबी धम्मानंद, सुत्तनिपात
2) पर्यावरण भूगोल - डॉ.शेटे, केचे- अभिजित प्रकाशन लातूर
3) पर्यावरण भूगोल -वराट , अलिझाड-विद्याप्रकाशन औरंगाबाद
4) पर्यावरण शास्त्र एरक भरूचा (युजीसी )
5) नेट/ सेट भूगोल - डॉ.सिसोदिया -उपकार प्रकाशन, आगरा
6) नेट/ सेट भूगोल - डॉ.जाट -गितांजली प्रकाशन, जयपूर

LBP PUBLICATION